सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ७० | गुरुवार, दि. ४ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## निवेदन

गुरुदेव दत्त महाराजांची जयंती म्हणजे दत्तभक्तांसाठी पवित्र दिवस. त्या निमित्ताने गुरुवार, दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंकातील 'मंगल पाना' त श्रीदत्त जयंतीचा विशेष मजकूर प्रसिद्ध करीत आहोत. याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

**– संपादक**



## दिनविशेष

४ डिसेंबर

- भारतीय नौदल दिवस
- वन्यजीव संरक्षण दिन
- थुंबा येथील तळावरून पहिले भारतीय क्षेपणास्त्र रोहिणीचे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले.
- 'अजित आगरकर' भारतीय क्रिकेटर यांचा जन्म
- 'शंकर केशव कानेटकर' कवी यांचे निधन.
- 'ज. ड. गोंधळेकर' मराठी चित्रकार यांचे निधन.
- 'व्ही. आर. कृष्ण अय्यर' भारतीय वकील आणि न्यायाधीश यांचे निधन.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

**क्या चेक बाउंस होने पर खराब होता सिबिल ?**

पान २ वर...



**७४ हजार भारतीय ब्रिटनसोडून परतले मायदेशी**

पान ३ वर...

# अमळनेर पालिकेसाठी ६४ टक्क्यांवर शांततेत मतदान

## तीन यंत्रांतील बिघाड वगळता सर्व केंद्रांवर प्रक्रिया सुरळीत; १२५ उमेदवारांचे भाग्य 'ईव्हीएम'मध्ये बंद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकींतर्गत लोकनियुक्त नगराध्यक्षपदासह एकूण १८ प्रभागांतील ३५ नगरसेवकपदासाठी मंगळवार, दि. २ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. मतदारांनी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत एकूण ९७ केंद्रांवर ईव्हीएम मशीनच्या माध्यमातून आपला मतदानाचा हक्क बजावला. यात एकूण ८९ हजार ७५१ पैकी ५७८७१ मतदारांनी मतदान केले, म्हणजेच एकूण ६४.४८ टक्के मतदान झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली. साईबाबा स्कूल, अँग्लो उर्दू स्कूल आणि संत सखाराम महाराज केंद्र या केंद्रांवरील ईव्हीएम मशीनमध्ये काही वेळ तांत्रिक बिघाड झाल्याने तेथील मतदान प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला होता. मात्र तेथे निवडणूक निर्णय अधिकारी निवृत्ती गायकवाड आणि सहाय्यक अधिकारी रूपेशकुमार सुराणा यांच्या मार्गदर्शनाखालील तांत्रिक पथकाने तत्काळ भेट देऊन मशीन बदलल्याने सुरळीत प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी एकूण ६, तर नगरसेवकपदासाठी १२६ उमेदवार रिंगणात होते. प्रभाग क्र. १ 'अ' मधील मतदान प्रक्रिया राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये स्थगित करण्यात आली आहे. येथील मतदान प्रक्रिया आता २० डिसेंबर २०२५ रोजी पार पडणार आहे.

शहरातील ताडेपुरा, गांधलीपुरा, आंबेडकर भवन आदी संवेदनशील भागांतही दिवसभर शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. सायंकाळी मात्र काही केंद्रांवर मतदारांनी मोठी गर्दी केल्याने तेथील मतदान रात्री सव्वाआठ वाजेपर्यंत सुरू होते. विद्यमान आमदार अनिलदादा पाटील यांनी शहर विकास आघाडी, तर माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांनी शिवसेनेच्या माध्यमातून या निवडणुकीसाठी पॅनल रिंगणात उतरविले होते. दरम्यान, राज्यातील सर्व पालिका निवडणुकांचा निकाल एकत्रितपणे रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर होईल, असे निवडणूक आयोगाकडून आदेशाद्वारे कळविण्यात आले आहे.

### प्रदत्त मतदानाची नोंद

या निवडणुकीसाठी सुमारे ५८२ शासकीय कर्मचारी कर्तव्यावर होते. त्यात मतदान केंद्राध्यक्ष सहाय्यक अधिकारी, शिपाई आणि पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता. एकाच मतदाराच्या नावाने आधी कोणीतरी मतदान करून जाण्याचे देखील प्रकार घडल्याने अशा ठिकाणी प्रदत्त मतदान घेण्यात आले. प्रदत्त मतदानासाठी स्वतंत्र मतपत्रिकांची व्यवस्था करण्यात आली होती.

### मतदारांसाठी सुविधा

प्रत्येक मतदान केंद्रावर दिव्यांग, दुर्बल आणि वृद्ध मतदारांसाठी व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात आलेली होती. किरकोळ तक्रारी वगळता मतदान शांततेत पार पडले. उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड, शरद काकळीज, भगवान शिरसाठ, सिद्धांत शिसोदे, गणेश पाटील, प्रशांत पाटील, नितीन कापडणे, विनोद संदानशिव यांच्यासह विविध पोलीस, होमगार्ड यांनी चोख बंदोबस्त ठेवला. निवडणूक निर्णय अधिकारी निवृत्ती गायकवाड, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्यासह विविध अधिकाऱ्यांनी मतदान केंद्रांना भेटी देऊन परिस्थितीवर नियंत्रण ठेवले.

### पोलिसांनी बजावली मोबाईल सांभाळण्याची जबाबदारी

राज्य निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या नियमान्वये मतदान केंद्राच्या शंभर मीटर परिसरात मतदारांना मोबाईल वापरण्यास बंदी आहे. तरीही काही मतदारांनी मतदानासाठी येताना सोबत मोबाईल आणले होते. त्यांना पोलिसांकडून मज्जाव करण्यात आल्याने त्यांनी पोलिसांकडेच आपले मोबाईल जमा केले. त्यामुळे काही केंद्रांवर पोलिसांना तात्पुरते मोबाईल सांभाळण्याचीही जबाबदारी चोखपणे पार पाडावी लागली. (खरेतर यामुळे काही पोलीस कर्मचाऱ्यांना निष्कारण डोक्याला ताण झाला. )



### लोकशाहीच्या विशेष रंगतदार उत्सवाचे आयोजन

विप्रो कन्सुमर केअर व आधार बहुउद्देशीय संस्था, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने अमळनेर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी पाच बूथवर सुशोभीकरण करण्यात आले होते. त्यात या बूथच्या ठिकाणी रांगोळी, फुगे सजावट, सेल्फी पॉइंट, आकर्षक मंडप, तसेच लोकशाहीविषयक संदेश देणारी विविध थिम्स लावण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे मतदारांचे याकडे लक्ष वेधले गेले. काही या ठिकाणी सेल्फीही घेतले. मतदान केंद्रांवर 'स्त्रीशक्ती-लोकशाहीची प्रेरणा', अॅड. ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूल 'युवा शक्ती-मतदानाची ऊर्जा', स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूल 'हरित शक्ती-पर्यावरणपूरक मतदान ग्लोबल इंग्लिश मीडियम स्कूल, 'अभिमान शक्ती-माझं मत, आरोग्यवर्धिनी केंद्र नगरपालिका पिंपरी रोड, माझा अभिमान', आणि 'जबाबदार शक्ती-मतदान म्हणजे कर्तव्य' नगरपरिषद कार्यालय, अशा पाच वेगवेगळ्या थिम्सवर आकर्षक सजावट आणि माहितीपर पोस्टर्स मतदार केंद्रावर लावण्यात आले होते. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता वाढविण्यास मोठी मदत झाली. मतदानासाठी आलेल्या नागरिकांनी केंद्रांवरील सेल्फी पॉईंटवर फोटो काढत लोकशाहीबद्दलचा अभिमान व्यक्त केला. विप्रो कंपनी आणि आधार संस्थेच्या संयुक्त सहकार्याने हे सर्व उपक्रम पार पडले. मतदारांनी सजावट आणि जनजागृती उपक्रमांचे भरभरून कौतुक केले. या उपक्रमात विप्रोचे फॅक्टरी मॅनेजर विजय बागजीलेवाले, पर्चेस मॅनेजर मिलिंद मार्कंडे, फायनान्स ऑफिसर आनंद निकम, विचार मॅनेजर चेतन थोरात, वेलफेअर मॅनेजर सुधीर बडगुजर आदींनी सक्रिय सहभाग नोंदविला. आधार संस्थेच्या अध्यक्षा डॉ. भारती पाटील, कार्यकारी संचालक रेणू प्रसाद, प्रा. विजय वाघमारे तसेच टीम सदस्य दीपक संदानशिव, अश्विनी भदाणे, मुरलीधर बिरारी, राकेश महाजन, तौसिफ शेख, दीपक विश्वेश्वर, योगीता पाटील, यास्मीन शेख, भावना सूर्यवंशी, ऊर्जिता शिसोदे, आनंद पगारे, मोहिनी धनगर, समाधान अहिरे, वंदना पावरा, सोनल पावरा, संगीत मैलागीर, सीमा शेख, सोनी चव्हाण यांसह पंडित जवाहरलाल समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही विशेष योगदान दिले. सुशोभीकरण केलेली केंद्रे, उत्साही मतदार आणि जनजागृतीच्या नवनवीन कल्पना यामुळे अमळनेरमध्ये लोकशाहीचा उत्सव यंदा विशेष रंगतदार ठरला.

# आता कोण निवडेल? याबाबतचा कुटाणा सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : शहरात नुकत्याच झालेल्या पालिका निवडणुकीचा उत्साह आता ओसरला आहे. राजकीय वातावरणात मात्र अजूनही तप्त धुसफूस सुरूच आहे. मतदान प्रक्रिया मंगळवारी शांततेत पार पडली. तत्पूर्वी मतदानापूर्वी शहरात मतदानाआधी कार्यकर्त्यांची धावपळ, फोन कॉल्स, मतदारांच्या भेटीगाठी आणि प्रभागनिहाय अंदाज यामुळे शहरात वेगळेच राजकीय वातावरण रंगले होते. मात्र, निवडणूक संपताच विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते आपापल्या प्रभागांतील मतांची चाचपणी करण्यात गुंतले आहेत. कोणत्या बूथवर किती मतदान झाले? आपले किती पक्के? त्यांनी किती मिळू शकतील? यावरच आता राजकीय गणिते मांडण्याचा कुटाणा सुरू असल्याचे दिसत आहे. काही ठिकाणी एकहाती आघाडीचा, तर काही ठिकाणी दोन्ही पॅनलमध्ये काट्याची टक्कर असल्याच्याही चर्चा रंगल्या आहेत.

यात समाजमाध्यमांनीही रंगत आणली आहे. फेसबुक, व्हॉट्सॲप ग्रुप, इन्स्टाग्राम स्टोरीजवर आमचाच विजय आहे, आम्हीच पुढे असे दावे-प्रतिदावे जोरात सुरू आहेत. समर्थकांच्या पोस्टना प्रतिक्रियांचा वर्षाव होत असून, तुमचे काय चालले? प्रभागात हवा कोणाची? मतदारच शांत पण नेतेच जास्त उत्साही अशा मिश्कील चर्चाही रंगताना दिसत आहेत. दरम्यान, शहरातील सर्वसामान्य मतदार मात्र आता फक्त निकालाची प्रतीक्षा करत शांतपणे आपापल्या कामांकडे वळले आहेत. परंतु राजकीय पातळीवर मात्र 'अंदाजाचा खेळ' चांगलाच तुफानी रंगला आहे.

# अमळगाव सोसायटीचा कारनामा!

## शेतकऱ्यांकडून शंभर रुपये उकळणी; तोंडी आदेशाचा आधार काय? शेतकरी संतप्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील अमळगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचा शेतकऱ्यांकडून सर्रास पैसे उकळण्याचा प्रकार पुन्हा एकदा समोर आला आहे. सातबारा, आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुकची झेरॉक्स यांसारख्या कागदपत्रांसह प्रत्येक शेतकऱ्याकडून शंभर रुपये सक्तीने घेतले जात असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. विशेष म्हणजे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचना आहेत, असा दावा स्वतः सोसायटीचे चेअरमन रावसाहेब पाटील यांनी केला आहे. दरम्यान, प्राप्त माहितीनुसार अमळगाव सोसायटी वगळता तालुक्यातील कोणत्याही सोसायटीत शेतकऱ्यांकडून पैसे घेतले जात नाहीत. केवळ कागदपत्रे जमा करून घेतले जात आहेत.

शेतकऱ्यांना प्रत्यक्षात सोसायटीकडून कोणताही ठोस लाभ मिळत नाही, कोणतीही सुविधा नाही. परंतु निमित्त एक आणि पैसे मात्र शेतकऱ्यांकडूनच अशी परिस्थिती झाली आहे. यापूर्वी याच सोसायटीने किसान क्रेडिट कार्डसाठी विशिष्ट रकमेची बेकायदेशीर आकारणी केली होती. शासनाने मोफत उपलब्ध करून देण्याचे आदेश असताना सोसायटीने आधीच आर्थिकदृष्ट्या त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा आर्थिक अडचणीत टाकण्याचा हा गैरप्रकार आहे. सध्या राज्य सरकारकडून कर्जमाफी प्रक्रियेची चाचणी सुरू असून, या अनुषंगाने कागदपत्रे मागविली जात आहेत. परंतु शंभर रुपये कोणत्या नियमाने? कोणत्या आदेशाने? कोणत्या सरकारी परिपत्रकानुसार? याबाबत सोसायटीकडे कोणतेही लेखी उत्तर नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून त्यांनी स्पष्टपणे प्रश्न उपस्थित केला आहे. सोसायटीने तोंडी आदेशाने पैसे घेण्याचा अधिकार कुठून आणला? हे सर्व संगनमताने सुरू असलेली ही लूट नाही तर काय? या सर्व प्रकरणाची तत्काळ चौकशी करून खरा प्रकार उघड करावा व जबाबदारांवर कारवाई करावी, अशा मागण्या शेतकरी वर्गातून जोर धरत आहेत. स्थानिक पातळीवरदेखील या उकळणीविरोधात तीव्र नाराजी आहे. या प्रकारावर प्रशासनाने त्वरित लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे.



"प्रती शेतकरी शंभर रुपये घेण्याबाबत आम्ही कोणतेही आदेश कोणत्याही सोसायटीला दिलेले नाहीत. अशा प्रकारे जर कुठे प्रकार उघड झाला तर कायदेशीर कारवाई केली जाईल.

**– रूपेशकुमार सुराणा, तहसीलदार, अमळनेर.**

# ऋतुराज गायकवाडने शतकासह रचला इतिहास

## १४ वर्षांत एकाही खेळाडूला हे जमले नाही, महाविक्रम केला नावावर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : रायपूर येथे बुधवारी झालेल्या भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताच्या ऋतुराज गायकवाडने अखेर आपल्यावर ठेवलेला विश्वास सार्थ ठरवला. कारण गेल्या सामन्यात संधी मिळूनही ऋतुराज दुर्दैवी ठरला होता. पण या सामन्यात विराट कोहलीच्या साथीने ऋतुराजने शतक झळकावले आणि त्याने ऐतिहासिक कामगिरी केली. जे कोणत्याही खेळाडूला गेल्या १४ वर्षांत जमले नव्हते, ते ऋतुराजने यावेळी करून दाखविले आहे. भारताला पहिल्या डावात ३५८ धावांपर्यंत मजल मारता आली.

ऋतुराजला गेल्या सामन्यातही संधी मिळत होती. गेल्या सामन्यातही ऋतुराज दमदार खेळी साकारेल, असे सर्वांना वाटले होते. पण त्यावेळी ऋतुराजचा भन्नाट झेल दक्षिण आफ्रिकेच्या डेव्हाल्ड ब्रेव्हिसने पकडला होता. हा झेल एवढा अफलातून होता, की विराट कोहलीलाही धक्का बसला होता. त्यामुळे ऋतुराजला पुढच्या सामन्यात संधी मिळणार की नाही, हे सर्व जण पाहत होते. ऋतुराजवर विश्वास ठेवण्यात आला आणि त्याने आपल्यावर ठेवलेल्या विश्वासाला तडा जाऊ दिला नाही. कारण ऋतुराजने या सामन्यात अशी दमदार खेळी साकारली की, टीकाकारांना चोख उत्तर त्याने दिले.

ऋतुराज आणि विराट कोहली यांची चांगली जोडी यावेळी जमली. ऋतुराजने तिसऱ्या विकेटसाठी विराट कोहलीबरोबर खेळताना १९५ धावांची दणकेबाज भागीदारी रचली. विराट ऋतुराजबरोबर खेळत होता खरा, पण या सामन्यात ऋतुराज आपली छाप पाडून गेला. विराटपेक्षा ऋतुराज हा जास्त आक्रमक फटकेबाज करत होता. ऋतुराजने या सामन्यात ८३ चेंडूंत १२ चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर १०५ धावांची खेळी साकारली, तर विराट कोहलीला यावेळी ९३ चेंडूंत सात चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर १०२ धावा करता आल्या.

पान ३ वर...

# अबब! सोने ११,३३० रुपयांनी महागले...

## चांदीतही प्रतिकिलो १०३० रुपयांनी वाढ; अनेक कुटुंबांचे बजेट विस्कळित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत मंगळवार, दि. ३ डिसेंबर रोजी २४ कॅरेट सोन्याच्या दरात काही अंशी घट झाली होती. मात्र बुधवारी सकाळी बाजार उघडल्यावर सोन्याच्या दरात पुन्हा मोठा बदल झाला. त्यानुसार १० तोळ्यांसाठी तब्बल ११ हजार ३३० रुपये वाढ झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली चांदीच्या दरातील घोडदौड सुद्धा कायम राहिली.

देशात पुन्हा एकदा सोन्याचे दर झपाट्याने वाढत आहेत. मधल्या एखाद्या दिवसाचा अपवाद वगळता गेल्या काही आठवड्यांपासूनचा हा कल सतत कायम आहे. सोन्याचे दररोज दर वाढताना दिसत असल्याने सामान्य ग्राहकांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे सध्या देशभरात लग्नाचा हंगाम सुरू आहे. परंपरेनुसार या काळात मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी केली जाते. मात्र सतत वाढणाऱ्या दरामुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक बजेट पूर्णपणे विस्कळित झाले आहे.

काही ग्राहकांनी खरेदी पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. तर काहींनी कमी प्रमाणात दागिने घेण्याचा पर्याय निवडला आहे. सुवर्ण व्यावसायिकांच्या मते आंतरराष्ट्रीय बाजारातील अस्थिरता, डॉलरच्या तुलनेत रुपयातील कमकुवतपणा आणि गुंतवणूकदारांकडून सोन्याकडे वाढती मागणी या काही कारणांमुळे दरवाढ होत आहे.

देशांतर्गत वायदा बाजार, मल्टी कमोडिटी एक्स्चेंज ऑफ इंडियामध्येही (एसीएक्स) सोन्याचे दर वाढताना दिसत आहेत. आगामी काळातही सोन्याच्या दरात चढ-उतार सुरू राहण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

पान ३ वर...



# क्या चेक बाउंस होने पर खराब होता सिबिल ?

## बाउंस होने की ८ वजहें, क्रेडिट स्कोर बढ़ाना है तो ध्यान रखें ये १० बातें

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कई बार हम किसी काम के लिए चेक लगाते हैं और ये बाउंस हो जाता है। आमतौर पर यह बैंक खाते में बैलेंस कम होने पर या किसी तकनीकी गलती से होता है। ऐसे में सबसे पहला सवाल यह है कि क्या इससे आपके सिबिल स्कोर पर कोई असर पड़ता है?

हम सब जानते हैं कि सिबिल स्कोर किसी भी लोन और क्रेडिट कार्ड के लिए कितना जरूरी है। अगर यह खराब हो जाए तो न सिर्फ नया लोन लेना मुश्किल हो जाता है, बल्कि बैंक ऊंची ब्याज दर भी वसूल सकते हैं।

**ऐसे में आज हम जानेंगे कि–**


- चेक बाउंस का आपके क्रेडिट स्कोर पर क्या असर पड़ता है?
- आपको किन बातों का ध्यान रखना चाहिए?
- सिबिल स्कोर कैसे बढ़ा सकते हैं?

**सवाल–** सिबिल स्कोर क्या होता है और क्यों जरूरी है?

**जवाब–** सिबिल स्कोर एक तीन अंकों का नंबर होता है, जो ३०० से ९०० के बीच होता है। यह आपकी क्रेडिट हिस्ट्री और लोन चुकाने की क्षमता को दर्शाता है। यह स्कोर जितना ज्यादा होगा, आप लोन लेने में उतने ही सक्षम माने जाएंगे और कर्ज पर ब्याज दर भी कम रहेगी।

इसे ऐसे समझिए कि अगर आपका सिबिल स्कोर ७५० या इससे ऊपर है, तो बैंक आपके लोन आवेदन को जल्दी और आसानी से मंजूर कर सकते हैं। वहीं, अगर स्कोर ६५० या इससे कम है, तो लोन लेने में मुश्किलें आ सकती हैं और बैंक ऊंची ब्याज दर वसूल सकते हैं। इसलिए सिबिल स्कोर अच्छा रखना बेहद जरूरी है।

**सवाल–** चेक बाउंस क्या होता है?




**जवाब–** चेक बाउंस या डिशऑनर्ड चेक तब होता है, जब आपके बैंक द्वारा जारी किया गया चेक क्लियर नहीं होता और भुगतान नहीं हो पाता है। इसके कई कारण हो सकते हैं। आमतौर पर पर्याप्त बैलेंस न होने पर ऐसा होता है। अक्सर लोग चेक बाउंस होने पर परेशान हो जाते हैं और सोचते हैं कि इससे तुरंत उनका सिबिल स्कोर गिर जाएगा।

**सवाल–** किन कारणों से चेक बाउंस होता है?

**जवाब–** चेक बाउंस होने के कई कारण हो सकते हैं। इसकी कुछ सामान्य वजह ग्राफिक में देखिए– इसलिए चेक से भुगतान करते समय इन बातों का ध्यान रखना बेहद जरूरी है। बार-बार चेक बाउंस होने से आपका वित्तीय रिकॉर्ड प्रभावित हो सकता है।

**सवाल–** क्या चेक बाउंस सीधे सिबिल स्कोर को प्रभावित करता है?

**जवाब–** आमतौर पर ऐसा नहीं होता है। बैंक या वित्तीय संस्थान चेक बाउंस की जानकारी सीधे सिबिल या किसी अन्य क्रेडिट रेटिंग एजेंसी को नहीं भेजते हैं। इसलिए केवल चेक बाउंस होने से आपका क्रेडिट स्कोर सीधे खराब नहीं होता है।

**सवाल–** चेक बाउंस होने से सिबिल स्कोर पर कब असर पड़ता है?

**जवाब–** अगर चेक बाउंस होने की वजह से आपकी ईएमआय या क्रेडिट कार्ड का भुगतान समय पर नहीं हो पाता है तो बैंक इसे क्रेडिट रेटिंग एजेंसी को रिपोर्ट कर सकता है। मिस्ड ईएमआय या लेट क्रेडिट कार्ड पेमेंट आपके सिबिल स्कोर को प्रभावित कर सकता है। उदाहरण के लिए अगर आपका चेक बाउंस हुआ और उसकी वजह से आप लोन की किस्त समय पर नहीं चुका पाए तो आपका सिबिल स्कोर गिर सकता है। इसके कारण भविष्य में लोन या क्रेडिट कार्ड लेने में मुश्किल हो सकती है।

**सवाल–** अगर बार-बार चेक बाउंस हो तो क्या होगा?

**जवाब–** अगर बार-बार चेक बाउंस हो रही है और इससे आपकी ईएमआय या क्रेडिट कार्ड की पेमेंट लेट होती है तो आपका सिबिल स्कोर तेजी से गिर सकता है।

वहीं अगर केवल कभी-कभार ईएमआय लेट हुई है या एक-दो बार चेक बाउंस हुआ है, तो इसका खास असर नहीं पड़ता है। इसमें आपका स्कोर ७००-७५० के बीच बना रहता है। ऐसे में लोन मिलना संभव होता है, लेकिन ब्याज दर थोड़ी ज्यादा हो सकती है या बैंक कम राशि के लोन की पेशकश कर सकता है।

**सवाल–** चेक बाउंस से बचने के क्या उपाय हैं?

**जवाब–** चेक बाउंस से बचने के लिए कुछ आसान और प्रभावी उपाय हैं।

अकाउंट में पर्याप्त बैलेंस रखें: चेक जारी करने से पहले देखें कि आपके खाते में पर्याप्त राशि मौजूद होनी चाहिए। हमेशा थोड़ा अतिरिक्त बैलेंस रखें ताकि अचानक कमी होने पर चेक बाउंस न हो।

**ओवरराइटिंग और गलती से बचें :** चेक पर तारीख, राशि (अंक और शब्द दोनों में) सही लिखें और सिग्नेचर सही तरीके से भरें। कोई संशोधन या गलती होने पर चेक बैंक द्वारा अस्वीकार की जा सकती है।

**सिग्नेचर अपडेट करें :** समय के साथ सिग्नेचर बदल जाता है। यदि आपका सिग्नेचर बैंक के रिकॉर्ड से मेल नहीं खाता, तो चेक बाउंस हो सकता है। इसे अपडेट करना जरूरी है।

**पोस्ट-डेटेड और एक्सपायर्ड चेक से बचें :** पोस्ट-डेटेड चेक की सही तारीख का ध्यान रखें और सुनिश्चित करें कि चेक वैधता समाप्त न हो।

**ओवरड्राफ्ट लिमिट का ध्यान रखें :** यदि आपका खाता ओवरड्राफ्ट पर है, तो चेक जारी करते समय लिमिट का ध्यान रखें।

**चेक को सुरक्षित रखें :** चेक को गीला न होने दें। ध्यान रखें कि यह फटा न हो या लिखावट अस्पष्ट न हो।

**सवाल–** चेक बाउंस के बाद क्या करना चाहिए?

**जवाब–** अगर आपका चेक बाउंस हो गया है, तो तुरंत बैंक और लाभार्थी से संपर्क करें। भुगतान तुरंत करें और अगर जरूरत हो तो बैंक से सही जानकारी लेकर दोबारा चेक जारी करें। समय पर समाधान करने से ईएमआय या क्रेडिट कार्ड पेमेंट मिस होने की संभावना कम होती है और सिबिल स्कोर पर कोई असर नहीं पड़ता है।

**सवाल–** चेक बाउंस से खराब हुआ सिबिल स्कोर कैसे सुधारें?

**जवाब–** अगर आपका सिबिल स्कोर किसी भी कारण से गिर गया है, तो इसे सुधारने के लिए ये कदम उठाएं। आइए इसे ग्राफिक के जरिए समझते हैं।


कुल-मिलाकर, चेक बाउंस का सीधा असर सिबिल स्कोर पर नहीं पड़ता है, लेकिन अगर इसके कारण आपकी ईएमआय या क्रेडिट कार्ड के भुगतान समय पर नहीं हुए, तो यह अप्रत्यक्ष रूप से आपका सिबिल स्कोर खराब कर सकता है। इसलिए, चेक जारी करते समय हमेशा सावधानी बरतें, खाते में पर्याप्त बैलेंस रखें और सभी विवरण सही भरें।

**सिबिल स्कोर केवल संख्या नहीं**

ये हमेशा याद रखें कि आपका सिबिल स्कोर केवल संख्या नहीं है, यह आपके वित्तीय विश्वास और भविष्य में लोन लेने की क्षमता का प्रमाण है। छोटी-छोटी सावधानियों से आप अपने स्कोर को मजबूत रख सकते हैं और भविष्य में बिना परेशानी के लोन या क्रेडिट कार्ड प्राप्त कर सकते हैं।

# भिजलेल्या कपड्याचा रंग गडद का दिसतो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



धुतलेला कपडा पिळून पाणी काढल्यानंतरही त्यात काही प्रमाणात पाणी राहतेच. असा ओला कपडा दोरीवर वाळविताना रंगीत कपड्याचा रंग ओला असताना गडद दिसतो. पण वाळल्यावर तो पुन्हा मूळ हलक्या रंगात परततो. पावसात भिजलेल्या कपड्यांचेही रंग गडद दिसतात.

**यामागील कारण काय?**

सुती कपडा हा कापसाच्या नैसर्गिक धाग्यांपासून बनलेला असतो. हे धागे विणताना त्यांच्यात सैल गुंफण तयार होते. ज्यामुळे धाग्यांमध्ये पोकळ्या राहतात. या पोकळ्यांमध्ये हवा भरलेली असते. कापसाच्या धाग्यांचा पृष्ठभाग खरखरीत असल्याने त्यावर पडणारा प्रकाश जास्त प्रमाणात विखुरला जातो. कमी प्रमाणात परावर्तीत होतो. परावर्तीत प्रकाश डोळ्यांपर्यंत पोहोचतो. त्यामुळे कपड्याचा रंग फिकट दिसतो.

जेव्हा कपडा ओला होतो तेव्हा पाणी धाग्यांमधील पोकळ्यांमध्ये शिरून हवेची जागा घेते. यामुळे प्रकाशाचे विखुरणे कमी होते. जास्त प्रकाश परावर्तीत होतो. परिणामी अधिक प्रकाश डोळ्यांपर्यंत पोहोचतो आणि रंग गडद दिसतो. कपडा वाळल्यावर पाणी बाहेर पडते, हवा पुन्हा पोकळ्यांमध्ये येते आणि प्रकाश पुन्हा जास्त विखुरला जाऊन रंग फिकट दिसतो.

रेशीम किंवा पॉलिएस्टरसारखे कृत्रिम धागे मात्र गुळगुळीत असतात. त्यांच्या विणकामात पोकळ्या कमी असतात. त्यांचा पृष्ठभाग गुळगुळीत असल्याने प्रकाश जास्त परावर्तीत होतो. असे कपडे भिजले तरी पाणी पोकळ्यांमध्ये साचत नाही. त्यामुळे परावर्तीत प्रकाशाच्या प्रमाणात फारसा बदल होत नाही. परिणामी त्यांचा रंग गडद दिसत नाही.



# हुरडा पार्टी म्हणजे काय?

## हुरडा बनविण्याची रेसिपी अन् खाण्याचे फायदे...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीमध्ये हुरडा पार्टीचे आयोजन केले जाते. शहरातील नागरिकांना थंडीच्या दिवसांत गावरान चव चाखण्यासाठी ही संधीच असते. महाराष्ट्राच्या अनेक भागांत शेतात, रानात हुरडा पार्टीचे आयोजन केले जाते. ज्वारीची कोवळी कणसे आगीत किंवा शेकोटीवर भाजली जातात. त्यावेळी ज्वारीचे कोवळी दाणे बाहेर पडतात त्यालाच 'हुरडा' म्हणतात. शेतात शेकोटी पेटवून मित्रमंडळी, कुटुंबीय यांच्यासोबत हुरडा खाण्याची मजा काही औरच असते. हुरड्यासोबत शेंगदाण्याची चटणी, खोबऱ्याची किंवा तिळाची चटणी, गूळ, दही, लोणचे, बाजरीची भाकरी, वांग्याचे भरीत हे जिन्नसही तोंडाची चव वाढवितात आणि पोटही तृप्त करतात.

ज्वारीची कणसे चुलीत भाजून बाहेर पडलेले कोवळे ज्वारीचे दाणे तुपात भाजून त्यावर चवीनुसार मीठ टाकायचे अन् कोणत्याही चटणीसोबत खायचे.

ज्वारीच्या कोवळ्या दाण्यांमध्ये लोह असते. त्यात कर्बोदकांचे प्रमाणही मुबलक असते. त्यामुळे त्यातून ऊर्जा मिळते. तसेच लोह, मॅग्नेशियम, कॉपरचे प्रमाणही असते. जे शरीरासाठी आवश्यक आहे.

# सुपारीचे पान ठरले वरदान!

## दाम्पत्याला व्यवसायाची आयडिया सुचली, आज करताहेत लाखो रुपयांची उलाढाल



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एका दाम्पत्याने परदेशातून आईची सेवा करण्यासाठी भारतात परतण्याचा निर्णय घेतला. त्यांना सुपारीच्या पानापासून उत्पादने बनविण्याची कल्पना सुचली. ती हीट ठरली आणि आज ते लाखो रुपयांची उलाढाल करत आहेत.

**परदेशात १५ वर्षे, मग मायदेशी परत**

कुरीकोस के. मैथ्यू आणि त्यांची पत्नी श्याबी मैथ्यू यांनी सौदी अरेबियात १५ वर्षे यशस्वी कारकीर्द घडवली. **कुरीकोस :** शारजाह इलेक्ट्रिसिटी, वॉटर अँड गॅस अथॉरिटीमध्ये कार्यरत **श्याबी :** सौदी आरोग्य मंत्रालयात नर्स २०१५ मध्ये मुलांची आणि ८२ वर्षीय आईची काळजी घेण्यासाठी त्यांनी केरळमधील कोट्टायम जिल्ह्यात परतण्याचा धाडसी निर्णय घेतला.

**आयडिया कशी सुचली?**

केरळमधील मलप्पुरम येथे नातेवाईकांना भेटायला गेल्यावर कुरीकोस यांनी जमिनीवर पडलेली सुपारीची पाने पाहिली. प्लास्टिक प्रदूषणाबाबतची जागरूकता. ९० च्या दशकातील प्लास्टिक मोल्डिंगचा अनुभव. यामुळे त्यांना कल्पना सुचली. सुपारीच्या पानांपासून प्लास्टिकला पर्याय. त्यांनी स्वतःचे आणि यंत्रे डिझाइन केली. आज 'हन्ना ग्रीन प्रोडक्ट्स' या ब्रँडने पूर्णपणे बायोडिग्रेडेबल उत्पादने बनवितात (६० दिवसांत नष्ट होतात).

**निर्मिती प्रक्रिया**

**१) कच्चा माल :** पलक्कड, वायनाड, कासरगोड, कन्नूर, मलप्पुरममधून २) **प्रक्रिया :** पाने स्वच्छ करणे, सुकवणे, भिजवणे (लवचिक बनविण्यासाठी). **३) उष्णता + दाब देऊन मोल्डिंग.**

उत्पादने : प्लेट्स, वाट्या, कटलरी, साबण बॉक्स, चप्पल.

**व्यवसाय मॉडेल**

| घटक | खर्च/किंमत |
|---|---|
| कच्चा माल (प्रतिशीट) | ३.४० रुपये ते ४ रुपये |
| १ शीट ३ प्लेट्स | ७ रुपये प्रतिप्लेट |
| १ शीट २ चप्पल | २५ रुपये प्रतिजोडी |
| ७ कर्मचारी | |

**वार्षिक निव्वळ नफा :** १२ लाख रुपये.

**श्याबी :** उत्पादन सांभाळते, **कुरीकोस :** तंत्रज्ञान आणि विपणन

**आंतरराष्ट्रीय यश**

**२०१८** : स्वतःची वेबसाइट
**२०१९** : न्यूयॉर्ककडून पहिला निर्यात ऑर्डर
**आज** : दर ३ महिन्यांनी २० फूट कंटेनर न्यूयॉर्कला
**निर्यात** : ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यूझीलंड, आखाती देश

**लोकप्रिय उत्पादने :**
बिर्याणी कंटेनर (आखाती देश)
फिश करी बाउल (ऑस्ट्रेलिया)

**बाजारपेठेची क्षमता :**
२०२५ पर्यंत : जागतिक सुपारी पान प्लेट बाजार $४५.५६ कोटी
२०३३ पर्यंत : ९५.४ कोटी (दुप्पट) डॉलर
उत्तर अमेरिका : ४० टक्के हिस्सा
मैथ्यू दाम्पत्यासाठी ही मोठी संधी.
परदेश सोडून आईसाठी परतलेले दाम्पत्य, सुपारीच्या पानांचा कचरा, इको-फ्रेंडली व्यवसाय, लाखो रुपयांची उलाढाल + निर्यात.
पर्यावरण आणि कुटुंब यांचा सुंदर मेळ.

# रात्री उशिरा जेवायची सवय पडू शकते महागात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अनेकांना रात्री उशिरा जेवायची सवय असते. प्रवासात होणारा उशीर, ट्रॅफिक, डेडलाईन्स, कामाचा ताण या सगळ्यात बऱ्याचदा जेवणासाठी उशीर होतो. कामामुळे कधी-कधी जेवायला उशीर होणे साहजिक आहे. मात्र काहींना रोज रात्री उशिरा जेवायची सवय लागते. रात्री उशिरा जेवल्यामुळे आरोग्यावर त्याचा काय परिणाम होतो हे अनेकांना माहीत नसते. रात्री ८ वाजल्यानंतर जेवणे आरोग्यासाठी नुकसानकारक ठरते. जेवणाच्या आणि झोपण्याच्या मध्ये किमान २ तासांचे अंतर असावे. रात्री उशिरा जेवल्याने पचनाबरोबर पुढील समस्या उद्भवू शकतात.

**वजन वाढणे**

रात्री उशिरा जेवल्याने वजन वाढू शकते. अनेकांना डाएट करून किंवा नियमित व्यायाम करूनही वजन कमी करण्यात यश मिळत नाही. याचे कारण रात्री उशिरा जेवणे.

**झोप पूर्ण न होणे :** रात्री उशिरा जेवल्याने शरीरातील नैसर्गिक पचन प्रक्रियेवर परिणाम होऊन झोपल्यावर अस्वस्थ वाटू शकते. त्यामळे झोप पूर्ण न होण्याची समस्या उद्भवू शकते.

**रक्तदाब अनियंत्रित होणे :** रात्री उशिरा जेवल्याने रक्तदाब अनियंत्रित होण्याची शक्यता असते. तसेच यामुळे मधुमेह, कोलेस्ट्रॉल वाढणे अशा समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे रात्री उशिरा जेवणे टाळावे.

**पचनाशी निगडित समस्या :** रात्री उशिरा जेवल्यानंतर लगेच झोपल्यामुळे पचनाशी निगडित समस्या उद्भवू शकतात.

**शरीरातील ऊर्जा कमी होणे :** रात्री उशिरा जेवल्याने दुसऱ्या दिवशी सकाळी बद्धकोष्ठता, डोकेदुखी किंवा इतर काही समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे शरीरातील ऊर्जा कमी झाल्याचे जाणवते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

पान १ वरून...

### ऋतुराज गायकवाडने शतकासह रचला इतिहास

ऋतुराजने आपले हे शतक ७७ चेंडूंत पूर्ण केले. तब्बल ११५४ दिवसांनी ऋतुराजला वन-डे क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यावर पहिले शतक झळकावता आले, पण गेल्या १४ वर्षांत एवढे जलद शतक दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळताना एकाही भारताच्या फलंदाजाला करता आले नव्हते. त्यामुळे ऋतुराजने या सामन्यात हा विक्रम आपल्या नावावर केला आहे. यापूर्वी २०११ मध्ये युसूफ पठाणने ६६ चेंडूंतच शतक झळकावले होते. पण गेल्या १४ वर्षांत जलद शतक झळकावणारा ऋतुराज हा भारताचा पहिलाच खेळाडू ठरला आहे.ऋतुराजने या सामन्यात फक्त शतक झळकावले नाही, तर त्याने एक महाविक्रमही आता आपल्या नावावर केला आहे.

### अबब! सोने ११,३३० रुपयांनी महागले...

सतत वाढणाऱ्या दरामुळे ग्राहक त्रस्त असून, लग्नसराईतील सोन्याची परंपरा निभावणे अनेकांसाठी कठीण बनले आहे.

जळगाव शहरातही सोमवारी ९२७ रुपयांची वाढ नोंदविली गेल्याने २४ कॅरेट सोने तीन टक्के जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ३३ हजार रुपयांपर्यंत महागले होते. त्यात मंगळवारी दिवसभरात १६४८ रुपयांची घट नोंदविली गेल्याने सोने जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ३१ हजार ४२८ रुपयांपर्यंत खाली आले होते. मात्र बुधवारी सकाळी बाजार उघडल्यावर १० तोळ्यांसाठी तब्बल ११ हजार ३३० रुपये तसेच १० ग्रॅमसाठी ११३३ रुपयांची वाढ नोंदविण्यात आली. परिणामी सोने तीन टक्के जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ३२ हजार ५६१ रुपयांपर्यंत जाऊन पोहोचले.

**चांदीही १०३० रुपयांनी वाढली**

जळगावमधील सुवर्ण बाजारपेठेत सोमवारी २०६० रुपयांची वाढ नोंदविली गेल्याने चांदी जीएसटीसह प्रतिकिलो एक लाख ७९ हजार २२० रुपयांपर्यंत वधारली होती. मंगळवारी दिवसभरात आणखी ४१२० रुपयांची वाढ नोंदविली गेल्याने चांदी जीएसटीसह एक लाख ८३ हजार ३४० रुपयांपर्यंत महागली होती. बुधवारी सकाळी बाजार उघडल्यावर पुन्हा १०३० रुपयांची वाढ नोंदविली गेली. त्यामुळे चांदी तीन टक्के जीएसटीसह एक लाख ८४ हजार ३७० रुपयांपर्यंत वधारली.

# ७४ हजार भारतीय ब्रिटनसोडून परतले मायदेशी

## कारण काय? याचे नेमके काय परिणाम होणार?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : परदेशातील विद्यापीठात शिक्षण घेण्याचे अनेकांचे स्वप्न असते. अनेकजण उच्च शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी ब्रिटनची निवड करताना दिसतात. परंतु अलीकडे हा कल कमी झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. तेथे असणारे भारतीयही आता ब्रिटन सोडण्याच्या तयारीत आहेत. आतापर्यंत ब्रिटनमधून हजारोंच्या संख्येने भारतीय बाहेर पडले आहेत. ब्रिटनमधील ताज्या स्थलांतराच्या आकडेवारीवरून आश्चर्यकारक मंदी दिसून आली आहे. २०२५ मध्ये धोरणात्मक बदल, आर्थिक दबाव आणि बदलत्या कामगार बाजार परिस्थितीमुळे हे बदल झाले आहेत. भारतीय विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांमध्ये मोठी घट नोंदविल्याचे, ऑफिस फॉर नॅशनल स्टॅटिस्टिक्सच्या (ओएनएस) लोकसंख्या आणि जनगणनेच्या कार्यकारी संचालक मेरी ग्रेगरी यांनी म्हटले आहे.

**७४ हजार भारतीयांनी सोडले ब्रिटन**

ब्रिटन सोडून जाणाऱ्यांच्या यादीत भारतीय नागरिकांची संख्या सर्वाधिक आहे. ब्रिटन सोडणारे सुमारे ४५ हजार भारतीय नागरिक विद्यार्थी व्हिसावर, २२ हजार नागरिक कर्मचारी व्हिसावर, तर सात हजार नागरिक इतर व्हिसावर ब्रिटनमध्ये होते. अशा एकूण ७४ हजार भारतीयांनी ब्रिटन सोडले. यानंतर चीनचा क्रमांक लागतो. चीनमधील ४२ हजार नागरिकांनी ब्रिटन सोडले. ऑफिस फॉर नॅशनल स्टॅटिस्टिक्स (ओएनएस) ने सांगितले, की ब्रिटन सोडून जाणाऱ्या आणि युरोपीय नसलेल्यांमध्ये भारतीय नागरिक सर्वाधिक होते.

असे असले तरीही ब्रिटनमध्ये येणाऱ्यांच्या यादीत भारतीय नागरिक अजूनही आघाडीवर आहेत. भारतीयांना सुमारे ९० हजार विद्यार्थी व्हिसा आणि ४६ हजार कर्मचारी व्हिसा मंजूर करण्यात आले आहे. 'ओएनएस'ने पुढे सांगितले, की ब्रिटनमध्ये येणाऱ्या आणि युरोपीयन नसलेल्या पहिल्या पाच देशांमध्ये भारतीय, पाकिस्तानी, चिनी आणि नायजेरियन नागरिकांचा समावेश आहे. ऑफिस फॉर नॅशनल स्टॅटिस्टिक्स (ओएनएस) ने नोंदविले की जूनपर्यंतच्या १२ महिन्यांत ब्रिटनमधून बाहेर पडलेल्या लोकांपेक्षा अंदाजे दोन लाख लोक ब्रिटनमध्ये आले. परंतु गेल्या वर्षीच्या तुलनेत हा आकडा खूप कमी आहे. गृह मंत्रालयाच्या सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार व्हिसा मंजुरीच्या संख्येतदेखील २०२२ नंतरची सर्वांत मोठी घट नोंदविण्यात आली आहे.

**भारतीय एवढ्या मोठ्या संख्येने मायदेशी का परतत आहेत?**

'ओएनएस'ने मायदेशी परतण्याचे कारण विद्यार्थी व्हिसावर ब्रिटनमध्ये आलेले लोक असल्याचे म्हटले आहे. अहवालात नमूद केले आहे, की विद्यार्थी व्हिसावर मूळतः ब्रिटनमध्ये आलेल्या आणि युरोपीयन नसलेल्या नागरिकांच्या स्थलांतरात वाढ झाली. प्रामुख्याने जून २०२५ पर्यंत मोठ्या संख्येने भारतीय आणि चिनी नागरिक स्थलांतरित झाले. विद्यार्थी आणि कुशल व्यावसायिकांच्या मायदेशी परतण्याचे सर्वांत मोठे कारण ग्रॅज्युएट रूट वा व्हिसा आहे. या व्हिसाद्वारे विद्यार्थ्यांना पदवी पूर्ण झाल्यावर दोन वर्षांसाठी ब्रिटनमध्ये राहण्याची परवानगी मिळते. ब्रिटन सरकारने २०२५-२६ पासून हा मार्ग अधिक कठोर करणार असल्याचे म्हटले आहे. हे बदल खालीलप्रमाणे असू शकतात.

- व्हिसा कालावधी कमी करणे.
- पात्रतेचे नियम अधिक कडक करणे.
- विद्यापीठांसाठी कडक तपासणी नियम लागू करणे.

हे बदल ब्रिटनच्या भविष्यासाठी धोक्या असू शकतात, असा इशारा उद्योजकांनी दिला आहे. एका अहवालानुसार ९३ टक्के लंडनस्थित व्यावसायिकांचे म्हणणे आहे, की आंतरराष्ट्रीय प्रतिभेमुळे कौशल्याची कमतरता भरून काढण्यास मदत होते, तर ८४ टक्के लोकांचा विश्वास आहे की परदेशी विद्यार्थ्यांना अभ्यासानंतर काम करण्याचा मार्ग मिळणे आवश्यक आहे.

**कर्मचारी व्हिसा नियम अधिक कडक**

'रेस्टॉरिंग कंट्रोल ओव्हर दि इमायग्रेशन सिस्टीम' नावाच्या २०२५ च्या स्थलांतर प्रक्रियेमुळे कुशल स्थलांतराचा आधार बदलत आहे. काही प्रमुख बदल खालीलप्रमाणे आहेत.

- पात्र व्यवसायांची यादी कमी करणे
- सोशल केअर कर्मचाऱ्यांसाठी परदेशातील भरती थांबविणे.
- जानेवारी २०२६ पासून इंग्रजी भाषेची आवश्यकता बी १ वरून बी २ पर्यंत वाढविणे.
- स्थायी निवास मिळविण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी पाच वर्षांवरून १० वर्षांपर्यंत वाढविणे. तसेच उत्पन्नाची मर्यादा अधिक कडक करणे.

यापैकी काही बदल आधीच लागू झाले आहेत. इतर २०२६ आणि २०२७ मध्ये लागू होतील. हाऊस ऑफ कॉमन्स लायब्ररी, यूके पार्लमेंटच्या अहवालात इशारा दिला आहे, की जुलै २०२५ मध्ये कुशल कामगार पात्रता यादीतून जे क्षेत्र वगळण्यात आले आहे त्यांच्यासाठी तो पर्याय आता उपलब्ध नाही. याचा परिणाम वाहतूक, दंतचिकित्स यांसारख्या क्षेत्रांमधील ग्रॅज्युएट व्हिसाधारकांवर झाला आहे. कामगार देशातून परत जाण्यामागील हे एक मुख्य कारण आहे.

**राहणीमानाचा खर्च आणि वाढता दबाव**

तसेच स्थलांतरितांना महागाई आणि मूलभूत राहणीमानाचा खर्च व्यवस्थापित करणे कठीण झाले आहे. ब्रिटनचा महागाई दर ३.६ टक्के आहे. 'ओएनएस'नुसार ऑक्टोबर २०२५ पर्यंतच्या वर्षात अन्नधान्याच्या किमती ४.९ टक्क्यांनी वाढल्या आहेत. ज्यामुळे महागाई अधिक वाढली आहे. ऑक्टोबर २०२२ च्या उच्चांकानंतर महागाई लक्षणीयरित्या कमी झाली असली तरी याचा अर्थ किमती कमी होत आहेत असा होत नाही. कोविड महामारीनंतर तेलाची मागणी वाढल्याने २०२२ मध्ये महागाई वाढली आणि रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यावर उर्जेच्या किमती पुन्हा वाढल्या.

**ब्रिटनमधील व्यावसायिकांनी व्यक्त केली चिंता**

एकीकडे सरकार धोरणे कडक करत आहेत, तर दुसरीकडे व्यावसायिक चिंता व्यक्त करत आहेत. लंडनच्या आर्थिक लॉबी गटांनी तंत्रज्ञान, वित्त, आरोग्यसेवा, अध्यापन आणि संशोधन या क्षेत्रांमध्ये कामगार तुटवडा कायम असल्याचे सांगितले आहे. अभ्यासानंतरच्या व्हिसाचे प्रमाण कमी केल्यास स्पर्धात्मकता कमकुवत होईल आणि ब्रिटनची विद्यापीठे जागतिक आकर्षण राहणार नाहीत, असाही इशारा त्यांनी दिला आहे.

स्थलांतर कमी करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांचा आर्थिक विकासावर नकारात्मक परिणाम होत आहे, असे द वर्क राइट्स सेंटरमधील डॉ. डोरा ऑलिव्हिया विकोल यांनी सांगितले. ब्रिटनच्या गृह सचिव शबाना महमूद यांनी सरकारच्या निर्णयाचे समर्थन केले आणि सांगितले. या सरकारच्या काळात निव्वळ स्थलांतर दोन तृतीयांशपेक्षा अधिक कमी झाले आहे. स्थलांतराचा वेग आणि प्रमाण यामुळे स्थानिक समुदायांवर प्रचंड दबाव आला होता. तरीही अनेक क्षेत्रे अजूनही युरोपीय नसलेल्या कामगारांवर विशेषतः भारतीयांवर अवलंबून आहेत. मुख्य म्हणजे ते ब्रिटनच्या शिक्षण, तंत्रज्ञान कर्मचारी आणि आरोग्यसेवा क्षेत्राचा महत्त्वपूर्ण भाग आहेत.

# कंत्राटी अभियंत्याविरुध्द लाच प्रकरणी गुन्हा दाखल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : लाभार्थ्याकडे घरकुलाच्या रकमेचा दुसरा हप्ता देण्यासाठी १० हजार रुपये लाचेची मागणी केल्याप्रकरणी धरणगाव पंचायत समितीच्या कंत्राटी ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यासह खासगी व्यक्तीविरुद्ध बुधवारी गुन्हा दाखल करण्यात आला. जळगाव येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केली. कंत्राटी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता गणेश संभाजी पाटील (वय ३१) आणि खासगी व्यक्ती सागर शांताराम कोळी (वय ३०, रा. निंभोरा, ता. धरणगाव) अशी संबंधितांची नावे आहेत. तक्रारदाराला २०२४-२५ या वर्षात पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत घरकुल मंजूर झाले आहे.

सदर योजनेतून तक्रारदाराच्या बँक खात्यावर पहिल्या हप्त्यापोटी फेब्रुवारी २०२५ मध्ये सुमारे १५ हजार रुपये जमा झाले आहेत. त्यांनी घरकुलाचे काम देखील केले आहे. त्यानंतर मंजूर घरकुलासाठी दुसरा हप्ता बँक खात्यावर जमा झाला नाही. त्यामुळे त्यांनी धरणगाव पंचायत समितीत जाऊन घरकुलासंदर्भात काम करणारे कंत्राटी अभियंता गणेश पाटील यांच्याकडे चौकशी केली. मात्र त्यांनी सध्या निधी नसल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदाराने संपूर्ण माहिती काढून पुन्हा चौकशी केली असता पाटील यांच्याकडून १० हजारांची लाचेची मागणी करण्यात आली. त्यामुळे तक्रारदाराने जळगावच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे १४ जुलैला तक्रार दाखल केली होती.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

बातमीसाठी संपर्क :
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

जाहिरातीसाठी संपर्क :
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

## खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर जि.जळगांव

**नोटीस**

(निवडणूक नियम नं. 4 (ब) प्रमाणे )

खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेरच्या जुन्या घटनेतील तरतुदीप्रमाणे एक अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष, एक विश्वस्त व आठ कार्यकारी मंडळाच्या सदस्य यांच्या जागांसाठी त्रैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम खालील दिलेल्या तपशिलाप्रमाणे ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | तारीख व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| 5) | निवडणूक कार्यक्रम जाहीर करणे | 03/12/2025 | |
| 6) | उमेदवारी अर्ज विक्री | 10/12/2025 | चिटणीस, खा. शि. मंडळ अमळनेर यांचे कार्यालय |
| 7) | उमेदवारी अर्ज स्वीकारणे | 13/12/2025 ते 16/12/2025 दुपारी 11 ते 3 यादरम्यान | चिटणीस, खा. शि. मंडळ अमळनेर यांचे कार्यालय |
| 8) | उमेदवारी अर्जाची छाननी | 17/12/2025 दुपारी 12 ते 4 दरम्यान | चिटणीस, खा. शि. मंडळ अमळनेर यांचे कार्यालय |
| 9) | उमेदवारी अर्ज माघार घेणे | 20/12/2025 दु.11 ते 3 दरम्यान | चिटणीस, खा. शि. मंडळ अमळनेर यांचे कार्यालय |
| 10) | चिन्ह वाटप करणे | 20/12/2025 दु.3 ते 4 दरम्यान | चिटणीस, खा. शि. मंडळ अमळनेर यांचे कार्यालय |
| 11) | मत नोंदणी | 04/01/2026 सकाळी 8 ते 5 पर्यंत | प्रताप कॉलेज, अमळनेर |
| 12) | मतमोजणी | 05/01/2026 | इंदिरा गांधी हॉल, अमळनेर |
| 13) | निवडणुकीचा निकाल जाहीर करणे | 11/01/2026 सकाळी 11:00 | प्रताप महाविद्यालय, राणे नाट्यसभागृह, अमळनेर |

टीप :- 1) निवडणुकीचे कामकाज रविवार व सुट्यांच्या दिवशी देखील सुरू राहील.
2) मतदानाच्या वेळेस मूळ आधार कार्ड, आधार कार्डची एक झेरॉक्स प्रत, मतदान कार्ड किंवा पॅनकार्ड तसेच एक पासपोर्ट साईज फोटो आणणे अनिवार्य आहे.

सही
प्रा. पराग पी. पाटील
चिटणीस,

शिक्का

सही
श्री. जितेंद्र शांतीलाल झाबक
अध्यक्ष,

खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर जि. जळगांव - 425401






# श्रीदत्तात्रयांचे अवतार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकूण सोळा अवतार भगवान दत्तात्रय यांनी घेतले, असे भाविक मानतात. दत्त सांप्रदायिक श्रीपाद वल्लभांना व नृसिंह सरस्वतींना इतिहास काळातील अनुक्रमे पहिले आणि दुसरे अवतार मानतात. दासोपंतांच्या परंपरेत दासोपंतांना सतरावा अवतार मानण्यात येते. इतकेच नव्हे, तर अक्कलकोटच्या स्वामी महाराजांची आणि माणिकप्रभूंचीही दत्तावतारातच गणना होते. श्री गुरुदेव दत्तात्रयांचे सोळा अवतार खालीलप्रमाणे...

**योगीराज**

ब्रह्मदेवाचे मानसपुत्र 'अत्री' हे पुत्रप्राप्तीसाठी पत्नीसह हिमालयात कठोर तपश्चर्या करीत होते. त्यांच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन साक्षात भगवान कार्तिक शुद्ध १५ ला प्रकट झाले. त्यांचे रूप स्फटिकासारखे ज्योतिर्मय होते. दत्तात्रय यांचा हा अवतार ' योगीराज ' म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांनी योगमार्गाचा पुरस्कार करून लोकांना सुखी केले. म्हणून वरील नाव पडले. हा अवतार एकमुखी चतुर्भुज व प्रत्यक्ष भगवान विष्णूंप्रमाणेच होता.

श्री ब्रह्मदेवांनी या सृष्टीची निर्मिती केली खरी. पण या विश्वाच्या निर्मितीनंतर सर्व जीवांना त्यांच्या पूर्वीच्या कर्मांप्रमाणे जे दुःख सहन करावे लागले ते पाहून ब्रह्मदेव चिंतीत झाले आणि म्हणून ते विश्वाच्या प्रभूला अर्थात भगवान विष्णूंना शरण आले. ' दत्तोऽहम् दत्तोऽहम् ' (मी स्वतः देतो– समर्पित करतो – शरण आलो आहे) अशी प्रार्थना केली. सृष्टीच्या कल्याणासाठी श्रीहरी विष्णू, ब्रह्मदेव यांच्यासमोर प्रकट झाले. त्यांनी ब्रह्मदेवांना योग आणि आत्मतत्त्वाचे ज्ञान करून त्यांना चिंतामुक्त केले. मनःशांती देऊन त्याचा प्रचार करण्यास उद्युक्त केले. ' दत्तोऽहम् दत्तोऽहम् 'चा जप करणाऱ्यांनाही समान फळ मिळेल, असा आशीर्वादही दिला. हा अवतार कार्तिक शुद्ध पौर्णिमेला, कृत्तिका नक्षत्रावर बुधवारी पहिल्या प्रहरी, सूर्योदयावेळी झाला. या अवताराने योगाचा (योग म्हणजे संपूर्ण अष्टांग योग/ युज् म्हणजे जोडणे – स्वतःला परमेश्वराशी) प्रचार केला, म्हणून त्याला ' योगेश्वर ' किंवा ' योगीराज ' म्हणून ओळखले जाते. या अवतारात श्रींचे स्वरूप सर्वांत आकर्षक, नाजूक आणि बर्फासारखे शुभ्र होते. श्रीकृष्णांप्रमाण, त्याला एकमुखी आणि चतुर्भुज होते.

**' दत्तोऽहम् ' प्रबोधकाय**
**श्रीकृष्णा जगदीश्वरा**
**योगेश्वरावताराय**
**दत्तात्रयाय नमो नमः ।**

' दत्तोऽहम् ' या मंत्राचा उपदेश करणाऱ्या (मी स्वतःला देतो म्हणजे माझे सर्वस्व तुझ्या चरणी अर्पण करतो – ही समर्पणाची भावनाच भक्तीमध्ये सर्वांत महत्त्वाची आहे. तरच भक्त सद्गुरूकृपेस प्राप्त होतो.) श्रीकृष्णस्वरूप संपूर्ण जगाचे ईश्वर असणाऱ्या, योगीराज अवतार धारण करणाऱ्या, श्रीदत्तात्रय यांना माझा नमस्कार असो.

# दत्त अवतारांचे महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकदा एक संत देवाबरोबर बोलत होता. त्याने देवाला स्वर्ग आणि नरक यांच्यातील फरक विचारला ' ये तुला प्रत्यक्ष दाखवतो. ' देव म्हणाले. त्याने संताला दोन दरवाजांजवळ नेले. त्याने पहिला दरवाजा ढकलला. एका मोठ्या खोलीत प्रवेश केला. एका मोठ्या गोल टेबलाभोवती अनेक माणसे बसली होती. टेबलाच्या मध्यावर रुचकर खिरीने भरलेले मोठे भांडे ठेवलेले होते. त्या खिरीच्या सुगंधाने त्या संत माणसाच्या तोंडाला देखील पाणी सुटले होते. पण मग त्याच्या लक्षात आले, की ती माणसे उपाशी, भुकेलेली दिसत होती. त्यांच्या हाताला लांब दांड्यांचे चमचे बांधलेले होते. त्यांना हात लांब करून खीर खाता येत नव्हती. कारण चमच्याचा दांडा हातापेक्षा लांब होता. त्यांच्या यातनांना अंत नव्हता. भुकेच्या भरीला खिरीच्या सुवासाने त्यांना वेड लावले होते. ' हा नरक आहे ' देव म्हणाले. ' चल आता स्वर्ग पाहू. ' ते दुसऱ्या दारातून आत आले. ती खोली सुद्धा हुबेहूब पहिल्या खोलीसारखीच होती. तेच टेबल तेच खिरीचे भांडे, भोवताली माणसे आणि हाताला बांधलेले चमचे. पण ही सगळी माणसे तृप्तसमाधानी व आनंदी दिसत होती, आपापसांत हसत आनंदाने राहत होती. ' मला कळत नाहीये..' संत म्हणाला, की सारख्याच खोल्या, टेबल, भांडी, खीर आणि तेच लांब दांड्यांचे चमचे, मग ही माणसे खाऊन तृप्त आणि ती उपाशी आणि दुःखी का? ' सोपं आहे ' देव म्हणाले, की या खोलीतील माणसे एकमेकांना भरवायला शिकली आहेत, एकमेकांना मदत करायला शिकली आहेत. पण हावरट मनुष्य फक्त स्वतःचा विचार करतो. जसे त्या खोलीत आहे जो तो स्वतःचा विचार करतो आणि उपाशी राहतो. जेव्हा तुम्ही दुसऱ्याची स्वप्ने पूर्ण करायला मदत कराल तेव्हा आपोआपच तुमची स्वप्ने सुद्धा पूर्ण होतील. स्वतःच्या गरजांपेक्षा इतरांच्या इच्छा व आवश्यकतांना अधिक मान किंवा प्राधान्यक्रम देणे हे समूह यशाचे गुपित आहे. यात आनंदाची बातमी अशी, की हा स्वर्ग किंवा नरक निर्माण करणे आपल्याच हातात असते. खोली, खीर, टेबल आणि चमचा. सगळ्यांना समान संधी मिळते. सर्वांना मदत करा. मग बघा आपल्या जीवनातील अंतरंग कसे खुलतात ते. आनंदी राहा.

**दत्त महाराजांचे गुरू**

श्री दत्त महाराजांनी २४ गुरू केले. त्यांनी प्रत्येकाकडून एक–एक गुण घेतला आणि त्यांना गुरू केले. एकदा दत्त महाराज एका गावातून जात होते. रस्त्याच्या कडेला एक लोहार लोखंड गरम करून त्यावर घाव घालत काहीतरी बनवत होता. तो लोहार त्याच्या कामामध्ये मग्न होता. एवढ्यात तेथून त्या राज्यातील राजाची सवारी आली. राजा म्हणाला, की म्हणजे त्याचा लवाजमा मोठा म्हणायचा. त्याच्या सवारीबरोबर ढोल–ताशे वाजत होते. ती सवारी हळूहळू तेथून गेली. तो लोहार मात्र त्याच्याच कामात मग्न होता. थोड्या वेळाने एक शिपाई मागून आला. त्याने लोहाराला विचारले, ' अरे! राजाची सवारी येथून गेली का? ' लोहार म्हणाला, ' मला माहीत नाही बाबा. मी माझे काम करत आहे.' शिपाई चिडला आणि त्याच्यावर ओरडत निघून गेला की काय राजाची सवारी जाते आणि याला कळत सुद्धा नाही, हा याच्या कामात काय खरच इतका मग्न होता '. दत्त महाराजांनी ते बघितले आणि तेथेच त्या लोहाराला आपला गुरू मानत म्हणाले, ' धन्य आहे तुझी एकाग्रता. मी सेवा करत असताना किंवा काम करत असताना मलाही अशीच एकाग्रता लाभू दे. '

# दत्ताची नावे आणि त्यांचा अर्थ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दत्त जयंतीला दत्ततत्त्व हे पृथ्वीतलावर नेहमीच्या तुलनेत एक हजार पटीने कार्यरत असते. या दिवशी दत्ताची मनोभावे उपासना केल्यास दत्ततत्त्वाचा जास्तीत जास्त लाभ मिळण्यास मदत होते. परंतु दत्तजयंती साजरी करण्यासंबंधी शास्त्रोक्त असा विशिष्ट विधी आढळून येत नाही. या उत्सवापूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे. यालाच गुरुचरित्रसप्ताह असे म्हणतात. या जयंतीच्या दिवशी दत्तमंदिरामध्ये भजन, कीर्तनादी कार्यक्रम आयोजीत केले जातात.

**दत्ताची नावे आणि त्यांचा अर्थ**

**दत्त** : दत्त म्हणजे ' आपण आत्मा आहोत ' याची अनुभूती देणारा. प्रत्येकात आत्मा आहे; म्हणून प्रत्येक जण चालतो, बोलतो आणि हसतो.

**अवधूत :** जो अहं धुतो, तो अवधूत. अभ्यास करताना आपल्या मनावर ताण येतो ना? खरेतर अभ्यास करण्यासाठी बुद्धी आणि शक्ती देणारा देवच आहे. पण अभ्यास करणारा मी आहे, असे वाटल्याने ताण येतो. हाच आपला अहंकार आहे.


**दिगंबर :** दिक् म्हणजे दिशा हेच ज्याचे अंबर, म्हणजे वस्त्र आहे असा. जो सर्व व्यापी आहे, ज्याने सर्व दिशा व्यापल्या आहेत, तो दिगंबर. जर ही देवता मोठी आहे, तर आपल्यासारख्या सामान्य जीवांनी त्याला शरणच जायला हवे.

**दत्ताच्या परिवाराचा भावार्थ**

**गाय :** दत्ताच्या मागे असलेली गाय ही पृथ्वी मानले जाते. कामधेनू यांचे प्रतीक आहे. कामधेनू आपणाला जे हवे, ते सर्व देते. पृथ्वी आणि गायही आपल्याला सर्व काही देतात.

**चार कुत्रे :** हे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद या ४ वेदांचे प्रतीक आहेत.

**औदुंबर वृक्ष :** दत्ताचे पूजनीय रूप. या वृक्षात दत्त तत्त्व अधिक आहे.



# प्रमुख दत्त क्षेत्रे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

योगीराज प. पू. वासुदेवानंद सरस्वती (टेंबे स्वामी) यांचे हे जन्मगाव. दत्तभक्त श्री गणेश शास्त्री आणि सौ. रमाबाई या ब्राह्मण दाम्पत्यांच्या पोटी श्रावण कृष्ण पंचमी शके १७७६ (दि. १३/०८/१८५४) रोजी माणगावी स्वामीचा जन्म झाला. ते दत्त अवतारी सिद्ध पुरुष होते. कारण गणेश शास्त्रींना गाणगापुरी सद्गुरू दत्तात्रयांनी दृष्टांन्त देऊन मी तुझ्या कुळात जन्म घईन, असा आशीर्वाद दिला होता. श्री टेंबेस्वामींचे आयुष्य म्हणजे केवळ दत्तात्रयांच्या कृपेने विकसित झालेले आणि सर्वांच्या आयुष्यात सुगंध पसरविणारे ब्रह्मकमळ. स्वामींनी पायी भारत भ्रमण करून दत्त संप्रदायाचा प्रसार केला. त्यांच्या कार्याला दत्त संप्रदायात तोड नाही. त्यांना सर्व विद्या अवगत होत्या.

श्री टेंबेस्वामी हे उत्तम वैद्य, मंत्रसिद्ध, यंत्र–तंत्रज्ञ, उत्कृष्ट ज्योतिषी, मराठी व संस्कृत आध्यात्मिक वाङ्मयातील प्रतिभावान व परतत्त्वस्पर्शी सिद्धकवी, वक्ते, हठयोगी, उत्कट दत्तभक्त व साक्षात दत्तात्रयस्वरूप होते. एकच खंत वाटते, की त्यांना संसारसुख लाभले नाही. जन्मताच मुलाचा मृत्यू आणि त्यानंतर पत्नीचे देहावसान या गोष्टी ते टाळू शकत होते. पण प्रारब्धभोग म्हणून त्यांनी त्यांचा स्वीकार केला. स्वामीजींना अनेक विद्या अवगत होत्या. अशा महान योगीराजाने गरुडेश्वर येथे १९१४ मध्ये समाधी घेतली. माणगाव हे क्षेत्र कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडीजवळ आहे. सावंतवाडी ते कुडाळ या बसमार्गावर माणगाव फाटा लागतो. तेथे उतरून बस मार्गाने ७ कि.मी. अंतरावर असलेल्या माणगावला जाता येते.

सावंतवाडीसाठी कोल्हापूरवरून नियमित बससेवा आहे. या ठिकाणी निवासासाठी भक्त निवास आहे. दुपारी १२ वाजता महाप्रसादाची व्यवस्था आहे. (दत्त मंदिर, माणगाव, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग कोकण फोन नं.– (०२३६२–२३६२४५, २३६४२५).

## गिरनार (जुनागड–सौराष्ट्र गुजरात)

हे क्षेत्र गुजरातमधील सौराष्ट्र प्रांतात जुनागड जिल्ह्यात येते. जुनागड या शहरापासून हे स्थान २ कि.मी. अंतरावर आहे. याच ठिकाणी श्री सद्गुरू दत्तात्रयांनी गोरक्षनाथास अनुग्रह दिला. हे स्थान उंच पर्वतावर असून, या ठिकाणी जाण्यासाठी ९९९९ पायऱ्या चढून जाव्या लागतात. या ठिकाणी सद्गुरू दत्तात्रयांच्या पादुका स्थापित आहेत. येथे नेहमी दत्तात्रयांचा निवास असतो. याचा प्रत्यय भक्तांना नेहमी येतो. या ठिकाणी जाण्यासाठी सुरत, बडोदा, अहमदाबाद या शहरातून जुनागड (गिरनार)साठी नियमित बससेवा आहे. रेल्वेमार्गाने जाणाऱ्या भक्तांसाठी सुरत, अहमदाबाद, राजकोट, जुनागड अशी रेल्वे सेवा आहे. या ठिकाणी राहण्यासाठी अनेक धर्मशाळा आहेत.

## कुरवपूर (जि. रायचूर) कर्नाटक

हे क्षेत्र कृष्णा नदीमध्ये असलेल्या एका बेटावर आहे. या क्षेत्राच्या चोहोबाजूंनी पाणी आहे. या क्षेत्री श्रीपाद वल्लभांनी १४ वर्षे वास्तव्य केले. श्री दत्त अवतारी योगीराज श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबेस्वामी) यांना याच ठिकाणी ' दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा..' या अठरा अक्षरी मंत्राचा साक्षात्कार झाला. याच ठिकाणी वासुदेवानंद सरस्वती यांच्या वास्तव्याने पावन झालेली गुहा आहे. याच ठिकाणी पाचलेगावकर महाराजांना श्रीपाद वल्लभांचा साक्षात्कार झाला. मुंबई, बेंगळुरू (व्हाया गुलबर्गा) या रेल्वेमार्गावर रायचूर हे रेल्वे स्टेशन लागते. तेथे उतरून रायचूर बसस्थानकावरून बस मार्गाने ३० कि.मी. अंतरावर अतकूर हे गाव लागते. तेथे जवळच कृष्णा नदीचा तीर लागतो. होडीने १ कि.मी. प्रवास करून मंदिरापर्यंत जाता येते. दुसरा मार्ग रायचूर–हैदराबाद या बसमार्गावर मतकल नावाचे गाव लागते. तेथे उतरून रिक्षाने किंवा बसने १६ कि.मी. अंतरावर असलेल्या पंचदेव पहाड या कृष्णा नदीच्या तिरावर असलेल्या गावाला जावे लागते. नंतर होडीने प्रवास करून १ कि.मी. अंतरावर मंदिरापर्यंत पोहोचता येते. हा मार्ग अधिक सोयीचा आहे. पंचदेव पहाड या गावाजवळ दत्त उपासक विठ्ठल बाबांनी वल्लभपूरम् नावाचा आश्रम स्थापन केला आहे. या आश्रमात निवासाची व भोजनाची व्यवस्था आहे. स्वतःच्या गाडीने कुरवपूरला जाणा–यांसाठी या आश्रमात गाडी पार्किंगची व्यवस्था आहे. वल्लभपूरम् या आश्रमात श्री श्रीपाद वल्लभ स्वामींचा दरबार आहे. याच ठिकाणी श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी सूर्य नमस्कार घालण्यासाठी येत असत. याच्या खुणा आजही पाहावयास मिळतात. कुरवपूरला राहण्यासाठी ३–४ खोल्या आहेत व पूजाऱ्यांना भोजनासाठी आधी सांगावे लागते. वासुदेव भट्ट पुजारी, श्री क्षेत्र कुरवपूर, जि. रायचूर.

## पिठापूर (पूर्व गोदावरी जिल्हा) आंध्र प्रदेश

हे क्षेत्र श्री दत्तात्रयांचा मनुष्यरूपी पहिला अवतार असलेले श्री श्रीपाद श्रीवल्लभ यांचे जन्मगाव आहे. या क्षेत्रास पादगया सुद्धा म्हणतात. आंध्र प्रदेशमध्ये पूर्व गोदावरी जिल्ह्यात काकिनाड्याजवळ हे क्षेत्र आहे. आपस्तंभ शाखेतील आपलराज आणि सुमती माता या ब्राह्मण दाम्पत्यांच्या उदरी श्रीपादांचा जन्म झाला. सर्वपित्री अमावास्येच्या दिवशी श्राद्धकर्मासाठी आलेल्या ब्राह्मणांच्या भोजनाच्या अगोदर सुमती मातेने दत्तात्रयांना भिक्षा वाढली. त्यामुळे संतुष्ट होऊन श्री दत्तात्रयांनी मी तुझ्या उदरी जन्म घेईन, असा आशीर्वाद सुमती मातेस दिला. जीवनात एक वेळेस या क्षेत्रास जाऊन श्रीपाद वल्लभांचे दर्शन जरूर घ्यावे. हैदराबाद, विशाखापट्टणम् या मार्गावर सामलकोट हे रेल्वे स्टेशन लागते. तेथे उतरून रिक्षा अथवा बसने (१० कि.मी.) अंतरावर असलेल्या पिठापूर या क्षेत्राला जाता येते. या ठिकाणी जाण्यासाठी सिकंदराबाद रेल्वेस्थानकांवरून नियमित रेल्वे आहेत. शिर्डी, विशाखापट्टणम, काकिनाडा एक्स्प्रेस या रेल्वेगाड्या मराठवाड्यातून पिठापूरला जाण्यासाठी सोयीस्कर आहेत. पुण्या–मुंबईच्या लोकांसाठी मुंबई भुवनेश्वर (कोणार्क एक्स्प्रेस), तर विदर्भातील लोकांसाठी दक्षिण किंवा ओखा–पुरी एक्स्प्रेस या रेल्वेगाड्या सोयीच्या आहेत. या ठिकाणी राहण्यासाठी भक्त निवास आहे. दुपारी १२ वाजता आणि रात्री ८ वाजता महाप्रसादाची व्यवस्था आहे. पिठापूरला जाणाऱ्या भक्तांनी १५ दिवस अगोदर आपली पिठापूरला जाण्याची तारीख संस्थानला फोनने कळवावी. जेणेकरून तेथे गेल्यावर रूम मिळण्यास अडचण निर्माण होणार नाही.

## लाड कारंजा (दत्त–वाशिम–महाराष्ट्र)

हे क्षेत्र दत्तात्रयांचा मनुष्यरूपी दुसरा अवतार असलेले श्री नृसिंह सरस्वती स्वामी यांचे जन्मगाव आहे. आजही स्वामींचा ज्या वाड्यात जन्म झाला तो वाडा चांगल्या स्थितीत आहे. याच वाड्यात श्री योगीराज वासुदेवानंद सरस्वती (टेंबेस्वामी) यांना श्री नृसिंह सरस्वती स्वामींचा साक्षात्कार झाला होता. त्या वाड्यामध्ये आजही स्वामींचे अस्तित्व जाणवते. हे एकमेव असे दत्तक्षेत्र आहे, की ज्या ठिकाणी बालस्वरूप श्री नृसिंह सरस्वती स्वामींची मूर्ती आहे. इतर क्षेत्री स्वामींच्या पादुका आहेत. श्री वासुदेवानंद सरस्वती यांच्या आज्ञेनुसार (लीलादत्त) श्रीपत ब्रह्मानंद सरस्वती स्वामी महाराजांनी या मंदिराची १९३४ मध्ये स्थापना केली. वाशीम, अमरावती, अकोला, यवतमाळ या जिल्ह्यांच्या ठिकाणापासून कारंजा हे ६० कि.मी. अंतरावर आहे. या शहरातून कारंजासाठी नियमित बससेवा आहे. मुंबई–हावडा या रेल्वेमार्गावर असलेल्या मूर्तिजापूर या रेल्वे स्टेशनवर उतरून बसमार्गाने ३० कि.मी. अंतरावर कारंजा या क्षेत्रास जाता येते. येथे निवासासाठी भक्त निवास आहे. दुपारी १ वाजता महाप्रसादाची सोय आहे. गुरुमंदिर कारंजा फोन –(०७२२६) २२४७५५, २२२४५५.

## माहूर (नांदेड–महाराष्ट्र)

हे क्षेत्र सद्गुरू दत्तात्रयांचे अवतार स्थान आहे. महासती अनुसयेच्या सत्त्व परीक्षेसाठी आलेल्या ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांनी संतुष्ट होऊन महासती अनुसया आणि अत्री ऋषी यांच्या विनंतीस मान देऊन याच ठिकाणी त्यांच्या पुत्राच्या रूपाने दत्त अवतार धारण केला. हे क्षेत्र फार प्राचीन आहे. या क्षेत्रास दत्तात्रयांचे विश्रांतीस्थान सुद्धा म्हणतात. या ठिकाणी रेणुकामातेचे मूळ शक्तिपीठ सुद्धा आहे. हे स्थान नांदेड जिल्ह्यात येते. नांदेडपासून ११० कि.मी. अंतरावर माहूर हे क्षेत्र आहे. पुण्या, मुंबईकडील भक्तांसाठी औरंगाबाद, जालना, मेहकर, वाशीम, पुसद, माहूर अशी सरळ बससेवा आहे. नांदेड हे मनमाड–हैदराबाद मार्गावरचे महत्त्वाचे रेल्वे स्टेशन आहे. या ठिकाणी निवासासाठी भक्त निवास आहे.

## नृसिंहवाडी (कोल्हापूर– महाराष्ट्र)

हे क्षेत्र कृष्णा आणि पंचगंगा या नद्यांच्या संगमावर अंदाजे ७०० वर्षांपूर्वी वसले आहे. सद्गुरू दत्तात्रयांचा द्वितीय अवतार असलेले श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांची राजधानी म्हणून हे क्षेत्र ओळखले जाते. श्री नृसिंह सरस्वती स्वामी या क्षेत्री १२ वर्षे राहिले. आपल्या अवतार कार्यामध्ये स्वामींनी अनेक अवतार लीला केल्या आहेत. त्यापैकी गुरूचरित्रातील प्रसंगांपैकी अमरापूर गावी घेवड्याचा वेल उपटल्याची कथा आहे. (नृसिंहवाडी पैलतीरी) बिदरच्या मुस्लीम राजाच्या मुलीची गेलेली दृष्टी स्वामींनी आशीर्वाद देऊन परत आणली. त्याची उतराई म्हणून विजापूर बिदर बादशाहने सध्याचे मंदिर बांधले आहे. कृष्णा नदीपलीकडच्या तीरावर योगीराज वासुदेवानंद सरस्वती (टेंबेस्वामी) यांचे परमप्रिय शिष्य श्री नृसिंह सरस्वती (दीक्षित स्वामी) यांनी स्थापन केलेले श्री दत्त अमरेश्वर मंदिर, वासुदेवानंद सरस्वती पीठ आणि यक्षिणी मंदिर आहे. त्याचा जीर्णोद्धार विद्यावाचस्पती दत्त स्वरूप श्री दत्त महाराज कवीश्वर यांनी करून कृष्णा नदीवर सुंदर घाट बांधला आहे. नृसिंह वाडीला गेल्यास दत्त अमरेश्वर मंदिरात अवश्य जावे. हे क्षेत्र कोल्हापूरपासून पूर्वेस ५० कि.मी. अंतरावर आहे. सांगली या जिल्ह्याच्या ठिकाणापासून २२ कि.मी. अंतरावर दक्षिणेस हे क्षेत्र आहे. सांगली बसस्थानकावरून या क्षेत्री जाण्यासाठी नियमित बससेवा आहे. सांगली–कुरुंदवाड बसने सद्धा येथे जाता येते. सांगली हे कोल्हापूर–मुंबई मार्गावरचे महत्त्वाचे रेल्वे–स्टेशन आहे.

येथे निवासासाठी देवस्थानचे भक्त निवास आहे. दुपारी १२ वाजता महाप्रसादाची सोय आहे. काही वर्षांपूर्वीच दत्तभक्त शरद उपाध्ये यांनी या ठिकाणी ' वेदभवन ' या वास्तूचे निर्माण केले आहे. ही वास्तू सुद्धा अवश्य पाहावी. श्री नृसिंह सरस्वती दत्त संस्थान, श्री नृसिंहवाडी, तालुका–शिरोळ, जिल्हा–कोल्हापूर, फोन (०२३२२), २७००६४, २७०००६, २७०५०१.

## श्री क्षेत्र कडगंची (गुलबगा– कर्नाटक)

वेदतुल्य अशा गुरुचरित्र ग्रंथाचे लेखन कडगंची येथे झाले. हे स्थान प्रसिद्धीस नव्हते; परंतु आता श्री सायंदेव दत्त देवस्थान म्हणून प्रसिद्धीस आले आहे. गाणगापूरपासून ३४ कि.मी. अंतरावर हे पुण्य स्थान आहे. सायंदेव साखरे हा श्री नृसिंह सरस्वतींचा प्रिय व श्रेष्ठ भक्त होता. त्याच्याच ५ व्या पिढीत सरस्वती गंगाधर यांचा जन्म झाला. श्री सिद्धमुनींनी सांगितले आणि सरस्वती गंगाधर यांनी लिहिले तोच गुरुचरित्र ग्रंथ होय. गुरुचरित्राच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटी श्री सिद्धनामधारक संवादे, असा उल्लेख आहे. त्यातील नामधारक म्हणजेच सरस्वती गंगाधर होय. सायंदेवाचे घराचे जागेवरच श्री सायंदेव दत्त देवस्थानचे मोठे बांधकाम चालू आहे. येथील श्री दत्तात्रयांची मूर्ती पाहून मन थक्क होते. श्री सायंदेव दत्त देवस्थान ट्रस्ट समिती कडगंची, ता. आळंद, जि. गुलबर्गा, कर्नाटक. फोन नं.– (०८४७७) २२६१०३, ९७४०६२५६७६

## अक्कलकोट (सोलापूर– महाराष्ट्र)

अक्कलकोटचे वटवृक्ष श्री स्वामी समर्थ महाराज हे दत्तावतारी सिद्ध पुरुष होते. पंजाबमधील पानिपतजवळ छेली या खेडेगावी गणेश मंदिराजवळ जमीन दुभंगून अष्ट वर्षाची मूर्ती प्रकट झाली. त्या मूर्तीने लगेच स्वामी समर्थ हा मनुष्यरूपी देह धारण केला. त्यानंतर त्यांनी कर्दळीवनात जाऊन ३०० वर्षे तपश्चर्या केली. ३०० वर्षे तप करताना त्यांच्या अंगावर वारूळ निर्माण झाले. एका लाकूडतोड्याने झाड तोडताना त्याच्या कुऱ्हाडीचा घाव स्वामींच्या मांडीला लागला. त्यामुळे त्यांची तपश्चर्या भंग होऊन स्वामी लोककल्याणासाठी कर्दळीवनातून बाहेर पडले. फिरत–फिरत स्वामी १८४४ मध्ये मंगळवेढ्यास आले. तेथे बारा वर्षे राहून चैत्र शुद्ध द्वितीया १८५६ मध्ये अक्कलकोटला आले. अक्कलकोटला त्यांचे वास्तव्य २२ वर्षे म्हणजे त्यांचे समाधी काळपर्यंत होते. त्यांचे चरित्र चमत्काराच्या कृतीने भरलेले आहे. त्यांचे वास्तव्य नेहमी वटवृक्षाच्या खालीच असे. त्यावेळचे इंग्रज पत्रकार व इतिहासकार जनरल अल्कार्ट हे अक्कलकोटला आले असता त्यांनी स्वामींचे दर्शन घेऊन ब्रिटनमध्ये गेल्यावर असे जाहीर केले, की आजच्या काळात प्रभू येशू पाहावयाचे असतील तर ते अक्कलकोटला आहे. स्वामींनी चैत्र शुद्ध त्रयोदशी सन १८७८ मध्ये अक्कलकोट येथे दुपारी १२ वाजता समाधी घेतली. अक्कलकोट हे सोलापूरपासून ३५ कि.मी. अंतरावर आहे. सोलापूरहून अक्कलकोटसाठी नियमित बससेवा आहे. येथे राहण्यासाठी भक्त निवास आहे व अन्नछत्र मंडळातर्फे दुपारी १२ व रात्री ८ वाजता महाप्रसादाची सोय आहे. वटवृक्ष स्वामी महाराज ट्रस्ट, अक्कलकोट, जि. सोलापूर (०२१८१) २२०३२१, भक्त निवास– २२१९०९.